# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६३ वी बैठक दिनांक ६ जानेवारी २०१०

## ठराव

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ६३ वी बैठक दि. ६ जानेवारी २०१० रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. इं. एकनाथ बा. पाटील | ... | सचिव (जसं) व सदस्य |
| ३. | इं. प्रफुल्लचंद्र चं. झपके | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**विशेष निमंत्रित**

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | मा. श्री. वल्लभ बेनके | ... | वि.स.स. व मा. उपाध्यक्ष |
| २. | मा. श्री. आनंदराव पाटील | ... | मा. उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. ह. रा. पवार | ... | आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य. |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती. एम. व्ही. कोकणे, सहसचिव | ... | प्रधान सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. सु. ल. पाटील | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. शि. मा. उपासे | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| ३. | श्री. अनिल शिरुडे | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मकृखोविम) |
| ४. | इं. अ. रा. कांबळे | .... | अ.अ. उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद |
| ५. | इं. ब. दा तोंडे | .... | अ.अ. व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,सोलापूर |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

**सही/-**
**(प्रफुल्लचंद्र झपके)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**सही/-**
**(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६३ वी बैठक दिनांक ६ जानेवारी २०१०

ठराव क्र. ६३/१

"ठराव करण्यांत येतो की,

१. नियामक मंडळाच्या ६२ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत.

२. नियामक मंडळाच्या त्यापूर्वीच्या (६१ व्या)बैठकीत पारित केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल (Action Taken Report), ठराव कायम करतेवेळी नियामक मंडळास सादर करावा"

---

ठराव क्र. ६३/२

"मौजे तळीये, ता.कोरेगांव, जि.सातारा गावाच्या पाणी पुरवठा योजनेसाठी विहीरीस कायम स्वरुपी देण्यात आलेल्या १.५० आर जागेच्या संदर्भात केलेली कार्यवाही नियामक मंडळाचे अवलोकनार्थ सादर केला असल्याने या बाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही."

---

ठराव क्र. ६३/३

"मौजे विखळे, ता.कोरेगांव, जि.सातारा गावाच्या पाणी पुरवठा योजनेसाठी विहीरीस कायमस्वरुपी देण्यात आलेल्या १.५० आर जागेच्या संदर्भात केलेली कार्यवाही नियामक मंडळाचे अवलोकनार्थ सादर केला असल्याने या बाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही."

---

ठराव क्र. ६३/४

"ठराव करण्यात येतो की, श्री. ज्ञा.द. शिंदे, वकील, यांची महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कायदे सल्लागार पदी दिनांक १/९/२००८ ते ३१/८/२००९ पर्यंत नियुक्ती केलेली आहे. सदर नियुक्तीस दि. ०१-०९-२००९ ते ३१-०८-२०१० पर्यंत मुदतवाढ देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

---

ठराव क्र. ६३/५

"ठराव करण्यात येतो की, सावरगांव साठवण तलाव, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथील भूसंपादन प्रकरणात खाजगी वाटाघाटीने संपादित केलेल्या जमिनीच्या घळभरणीपूर्वी नष्ट करण्यात आलेल्या विहिरी, पाईपलाईन, गोठे, वनझाडे, फळझाडे इ. ची मूल्यांकित रक्कम रु. १,११,०७,७७६/- (रु. एक कोटी अकरा लक्ष सात हजार, सातशे शहात्तर फक्त) संबंधित प्रकल्पग्रस्त शेतक-यांना जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचेमार्फत अदा करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. बुडीत क्षेत्रातील अंतिम निवाड्यातून वगळलेल्या बाबींसाठी मोबदला रक्कम अनुज्ञेय असलेल्या प्रकल्पग्रस्तांचा व देय रकमेचा तपशील परिशिष्ट क्र. १ प्रमाणे राहील"

---

"मान्य"

सही/-
(प्रफुल्लचंद्र झपके)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

सही/-
(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६३ वी बैठक दिनांक ६ जानेवारी २०१०

ठराव क्र. ६३/६

"ठराव करण्यात येतो की, उजनी जलाशयाचे महत्व व धरणाची सुरक्षितता विचारात घेऊन त्यादृष्टीने संपूर्ण जलाशयाकरिता मासेमारीसाठी प्रचलित शासन नियम तसेच मत्स्यव्यवसाय विभागाकडील नियम व कार्यपद्धतीचा अवलंब करुन एकत्रितपणे जाहीर निविदा मागवून अभिकरण निश्चिती करावी. सदर प्रस्तावित निविदेच्या प्रारुप कागदपत्रांमध्ये वरील बाबींच्या (उजनी धरणाची सुरक्षितता) अनुषंगाने उचित अटी व शर्ती तसेच सुयोग्य कलमांचा समावेश करावा. जलाशयावरील मासेमारीसाठी उजनी धरण परिसरातील स्थानिक मच्छिमारांनी/सर्व नोंदणीकृत सहकारी मच्छिमार संस्थांनी एकत्रितपणे महासंघ (शिखर संस्था/Federation) स्थापन करुन त्यांना निविदा प्रक्रियेत सहभाग घेण्यास सूचित करावे. त्यांना निविदा देकारामध्ये सुयोग्य मर्यादेपर्यंत किंमत प्राधान्य (Price Preferance) देण्याबाबत विचार करणेत येईल."

---

ठराव क्र. ६३/७

''ठराव करण्यांत येतो की, सन २००७-०८ या वर्षाचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या लेखापरिक्षणानंतर महालेखापाल, मुंबई यांनी निर्गमित केलेला अलग लेखापरिक्षण अहवाल (S.A.R.) अनुपालनासह विधानमंडळासमोर सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे''.

---

ठराव क्र. ६३/८

"महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने महामंडळ स्तरावर सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या प्रकल्पांची माहिती" हा विषय नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही.

---

ठराव क्र. ६३/९

"ठराव करण्यात येतो की लघु पाटबंधारे तलाव चिटेघर ता.पाटण जि.सातारा प्रकल्पाच्या बाधीत खातेदारांना फळझाडे व वनझाडे मुल्यांकन रक्कम रुपये ९८,४१,०८१/-(अठ्ठयाण्णव लक्ष एकेचाळीस हजार एक्याऐंशी फक्त) खालील प्रमाणे संबंधित शेतक-यांना अदा करणेसाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**(अ) फळझाडे**

| अ.क्र. | प्रकल्पाचे नांव | एस. आर. क्र. | गावाचे नांव | खाते दार संख्या | गट क्र. | संयुक्त मोजणीचा दिंनाक | फळझाडांचा प्रकार | संख्या | मूल्यांकन रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | चिटेघर ल.पा. प्रकल्प | ६०५ | चिटेघर | ४९ | ३८ ते ७० | १.२.०१ | आंबा,(१४८७)<br>फणस,(७४)<br>पेरु, (२८६)<br>जांभूळ(६३५)<br>इतर (१८) | २५०० | ६३५८६७८ |

"मान्य"

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (प्रफुल्लचंद्र झपके) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६३ वी बैठक दिनांक ६ जानेवारी २०१०

| अ.क्र. | प्रकल्पाचे नांव | एस. आर. क्र. | गावाचे नांव | खाते दार संख्या | गट क्र. | संयुक्त मोजणीचा दिंनांक | फळझाडांचा प्रकार | संख्या | मूल्यांकन रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| २ | | ६०३ | साखरी | ३७ | ९५४ ते १०४६ | २५.१.०१ | आंबा, (८८०)<br>फणस,(८)<br>पेरु, (१)<br>जांभूळ (७६)<br>इतर (३१) | ९९६ | १३९०२९६ |
| ३ | | ६०१ | घाणव | ४ | ४१ते ४७ | ८.३.०१ | आंबा,(१०)<br>पेरु(१६) | २६ | ५७६८५ |
| ४ | | ६०२ | मेंडोशी | १६ | १३३१ ते १३९२ | २५.१.०१ | आंबा,(७०८)<br>फणस,(८)<br>पेरु, (९)<br>जांभूळ (८७८)<br>इतर (२८) | १६३१ | १६८१६८४ |
| | | | | | | | **एकूण (अ)** | | **९४८८५२३** |

## (ब) वनझाडे

| अ.क्र | प्रकल्पाचे नांव | एस.आर.क्र. | गावाचे नांव | खाते दार संख्या | गट क्र. | संयुक्त मोजणीचा दिंनांक | वन झाडांचा प्रकार | संख्या | मूल्यांकन रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | चिटेघर ल. पा. प्रकल्प | ६०५ | चिटेघर | २० | ३४ ते ६० | १७.४.०१ | चंदन,(३)<br>सावर, (२२)<br>भोकर,(४)<br>मुही, (२)<br>साजवन, (२)<br>निलगिरी, (४)<br>साग (-)<br>इतर (३५) | ७२ | ५६७८८ |
| २ | | ६०३ | साखरी | ४३ | ९५४ ते १११० | १७.४.०१ | चंदन, (१०)<br>सावर, (४८)<br>भोकर, (-)<br>मुही, (९)<br>साजवन, (-)<br>निलगिरी (३८)<br>साग(२९३)<br>इतर १०८ | ५०६ | २३४१४७ |
| ३ | | ६०१ | घाणव | ६ | ४१ते ४७ | ७.४.०१ | चंदन,(-)<br>सावर,(११)<br>भोकर,(-) | ८७ | २२४७५ |

**सही/-**
**(प्रफुल्लचंद्र झपके)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**“मान्य”**

**सही/-**
**(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६३ वी बैठक दिनांक ६ जानेवारी २०१०

| अ.क्र | प्रकल्पाचे नांव | एस.आर.क्र. | गावाचे नांव | खातेदार संख्या | गट क्र. | संयुक्त मोजणीचा दिनांक | वन झाडांचा प्रकार | संख्या | मूल्यांकन रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | मुही, (-)<br>साजवन, (-)<br>निलगिरी, (-)<br>साग (३९)<br>इतर (३७) | | |
| ४ | | ६०२ | मेंडोशी | ६ | १३१४ ते १३२७ | २३.१.०२ | चंदन,(७२)<br>सावर,(१४)<br>भोकर, (१६)<br>मुही,(१)<br>साजवन,(४९)<br>निलगिरी,(१४७)<br>साग(१३)<br>इतर (१२५) | ४३७ | ३९१४८ |
| | | | | | | | | **एकूण (ब)** | ३५२५५८ |
| | | | | | | | | **एकूण (अ+ ब)रुपये** | ९८४१०८१ |

**(रुपये ९८,४१,०८१/- अठ्ठयाण्णव लक्ष एकेचाळीस हजार एक्याऐंशी फक्त)**

तदनंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**"मान्य"**

**सही/-**
**(प्रफुल्लचंद्र झपके)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**सही/-**
**(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**